**प्रेसनोट दिनांक - २६/०७/२०१९**

**डेक्कन पोलीस स्टेशन, पुणे शहर**

नाशिक येथुन रागाच्या भरात निघुन आलेल्या मुलीस पोलीसांचा आसरा.

---

दिनांक २५/०७/२०१९ रोजी सुजित गायकवाड, फिन सर्व्हीसेस कंपनीचे टिम मॅनेजर यांनी नोकरीसाठी त्यांचे ऑफिसमध्ये आलेल्या नेहा गजानन पाटोळे ही घरातुन कोणास काहीएक न सांगता निघुन आल्याचे समजल्याने तिस पोलीस स्टेशन येथे घेवुन आले. सदर मुलीकडे श्रीमती निकम, पोलीस उपनिरीक्षक, श्रीमती ढवळे मपोना ७९०७, श्रीमती भगत मपोशि ७०८६ यांनी चौकशी करता तिने राहण्याचा पत्ता कामगार नगर, त्रिंबकरोड, सातपुर नाशिक असा सांगुन पुण्यात नोकरी करण्यासाठी घरात कोणास काहीएक न सांगता निघुन आल्याचे सांगितले. लागलीच सातपुर पोलीस स्टेशन, नाशिक शहर येथे संपर्क करुन काही मिसिंग दाखल आहे काय या बाबत चौकशी केली असता कोणत्याही प्रकारची तक्रार दाखल नसल्याचे श्री दराडे, पोहवा ८३८, नाशिक शहर यांनी सांगितले.

सदर मुलीकडे आई-वडीलांची चौकशी करता तिने वडील गजानन पाटोळे यांचा मोबाईल नंबर सांगितल्याने सदर नंबर वरती संपर्क करुन मिसिंग मुली बाबत चौकशी करता त्यांनी नेहा ही माझी मुलगी असुन रागाच्या भरात घरातुन निघुन गेली आहे असे सांगुन तिला घेण्यासाठी उदया पुणे येथे येतो असे सांगितले. सदर मुलीची तात्पुरत्या स्वरुपाची कोठेही राहण्याची सोय नसल्याने तिस महादेवी जाधवर, अध्यक्ष, बालकल्याण समिती शिवाजीनगर पुणे मो. यांचे तोंडी आदेशान्वये कुसूमबाई मोतीचंद महिला सेवाग्राम, कर्वेरोड पुणे -४ सेवाग्राम येथे दाखल करणार असल्याचे सांगितले. आपल्या मुलीस पुणे येथे कोणताही आधार नसतांनाही पुणे पोलीसांच्या आधारामुळे मुलगी सुखरुप आहे असे म्हणुन गजानन पाटोळे यांनी पुणे शहर पोलीसांचे आभार मानले.

